**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 11.10.2025**

---

**धन-धान्ययोजना**

प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजने'चा शुभारंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथून दूरस्थ पद्धतीनं झाला. देशभरातल्या अनेक ठिकाणी या योजनेच्या शुभारंभाचे कार्यक्रम झाले. यावेळी अनेक शेतकरी दूरस्थ पद्धतेने जोडले गेले होते. राज्यातला मुख्य कार्यक्रम पुण्यात राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली झाला.  प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजनेत राज्यातील ९ जिल्ह्यांची निवड झाली असून केंद्राच्या आणि राज्य शासनाच्या योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज पुण्यात दिली.  यादृष्टीने राज्य शासनाने जाहीर केलेल्या वेगवेगळया योजना आणि मदतीची माहिती भरणे यांनी दिली. यावेळी महाडीबीटीच्या माध्यमातून विविध योजनांच्या लाभासाठी सर्वाधिक ४३ लाख १५ हजार शेतकऱ्यांची निवड केल्याची माहिती देण्यात आली.

अतिवृष्टीचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानाबाबतची माहिती संकलित करण्याचं काम अंतिम टप्प्यात आहे. निधीसाठीचा प्रस्ताव लवकरच केंद्र सरकारला पाठवण्यात येणार असून, दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत करण्यात येईल, अशी माहिती कृषिमंत्र्यांनी दिली. राज्य कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेत आज पुण्यात झालेल्या बैठकीनंतर भरणे यांनी पत्रकारांशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते.

**पीआरओ डिफन्स**

पुण्यामधील आर्मी इन्स्टिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीनं 'इंडियन आर्मी टेरियर सायबर क्वेस्ट २०२५' स्पर्धेत अव्वल स्थान मिळवलं आहे. एआयटीच्या चमूनं अत्यंत चुरशीच्या अशा डेटाथॉन मध्ये हा विजय मिळवला आहे. ९ ऑक्टोबर रोजी विजयी संघाला दिल्लीत आयोजित समारंभात लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्याकडून प्रतिष्ठेची समजली जाणारी मिलेनिअल ट्रॉफी प्रदान करण्यात आली.

**पिंचिंप्रथम**

महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा आयुक्तालयाकडून महानगरपालिकांच्या आरोग्य सेवांची वेळोवेळी तपासणी करून त्यांच्या कार्यप्रदर्शनाच्या आधारे क्रमवारी जाहीर केली जाते. या आयुक्तालयामार्फत नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या जुलै आणि ऑगस्ट महिन्याच्या आरोग्य कार्यक्रमांच्या क्रमवारी मध्ये राज्यातील एकंदर २७ महानगरपालिकांना मागे टाकत पिंपरी चिंचवड महापालिकेनं प्रथम क्रमांक मिळवत सलग पाचव्यांदा राज्यात अव्वल स्थान मिळवलं आहे.

**पिंचि/वर्धापन**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ४३ व्या वर्धापन दिनानिमित्त आज सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महापालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी या सोहळ्यात सहभाग नोंदवत गीतांचं सादरीकरण केलं.

**रेल्वेअंडरब्रिज**

संगमवाडी इथल्या येथील आरटीओ समोरील चौकातील तसंच मंगळवार पेठेतील शाहीर अमर शेख चौकातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी या दोन्ही चौका दरम्यान आणखी एक रेल्वे अंडर ब्रिज बांधण्याचं नियोजन सुरू आहे. पुणे शहरातील अत्यंत वर्दळीच्या या दोन्ही चौकांना जोडणारा हा पूल सुमारे १०० वर्षांपूर्वीचा आहे.

**आरोग्यसाहित्यसंमेलन**

रुग्ण हक्क परिषदेतर्फे पहिले ‘आरोग्य साहित्य संमेलन’ येत्या १९ ऑक्टोबरला बालगंधर्व रंगमंदिरात होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सकाळी १०

वाजता या संमेलनाचं उद्घाटन होईल. या संमेलनात डॉक्टर स्मिता आणि डॉक्टर रवींद्र कोल्हे यांना 'महाराष्ट्र आरोग्य भूषण' पुरस्कारानं गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती संमेलनाचे स्वागताध्यक्ष उमेश चव्हाण आणि चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांनी पुण्यात दिली. या संमेलनानिमित्त पुणे आरोग्य महोत्सवाचंही आयोजन करण्यात येणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येनं उपस्थित राहावं असं आवाहन संयोजकानी केलं आहे.

**<u>मॅरथॉन</u>**

अंमली पदार्थांविरोधात उद्या 'पुणे वर्ल्ड मॅरेथॉन' ही स्पर्धा होणार आहे.उद्या पहाटे महाळुंगे बालेवाडी इथल्या श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलातून या स्पर्धेला सुरुवात होणार आहे. या मॅरेथॉनमध्ये सुमारे १० हजार धावपटूंचा सहभाग असून त्यामध्ये नामवंत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय धावपटू, लष्कर, पोलिस कर्मचारी, विद्यार्थी आणि स्वयंसेवी संस्थांचा समावेश आहे. ही स्पर्धा लोहा फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात आली आली आहे.

**<u>खरद्दीचीगर्दी</u>**

दिवाळीच्या खरेदीसाठी संपूर्ण पुणे शहरात गर्दी होत आहे, त्यामुळे रस्ते खोदाईच्या कामांना या काळात स्थगिती द्यावी, अशी मागणी काँग्रेसचे माजी आमदार मोहन जोशी यांनी पुणे महापालिका आयुक्तांकडे आज केली. शहरात सध्या 28 किलोमीटर लांबीच्या रस्त्यांवर सीसीटीव्ही केबल टाकण्यासाठी खोदाईचं काम चालू आहे.

**<u>अतिक्रमणकारवाई</u>**

कर्वेनगर भागातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकातील अतिक्रमणांवर पुणे महापालिका प्रशासनानं कारवाई केली आहे. या कारवाईनंतर पुन्हा या चौकात अतिक्रमणे होणार नाहीत, यासाठी आवश्यक ती काळजी महापालिकेच्या वतीने घेतली जाणार आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल 32 पूर्णांक 8 दशांश अंश सेल्सिअस तर किमान १९ पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

**तर हा होता आजचा पुण□वृत्तांत. उद्या पुन्हा भट्टू विविधभारती पुण□केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुण□वृत्तांत मध्य□ नमस्कार.**